**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. – ४</u>** **<u>नि.दि.दा.क्र.७३/२०२३</u>**

**यादवराव विरुध्द मनोहर**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की ,** **निशाणी – ५७**

**सरतपासणी शपथेवर सुरु वादी तर्फे वकील श्री. गजवे यांच्या मार्फत –**

५. मला माझे निशाणी ५७ कडील सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखविण्यात आले. त्यातील सर्व मजकूर मी सांगितल्याप्रमाणे लिहीला आहे तो खरा व बरोबर आहे. त्यावर मी सहया केल्या आहेत.

**सरतपास संपला**.

**उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री. पुडके यांच्या तर्फे सुरू –**

६. मी वादीला ओळखतो. माझे त्यांचे ते गावातील असल्याने संबंध आहे. माझे वादीकडे येणे जाणे आहे. हे म्हणणे खरे नाही की केस मध्ये जबाब देण्यासाठी वादीने मला सांगितले. हे म्हणणे खरे आहे की वादी यादवराव व प्रतिवादी मनोहर आजूबाजूला राहतात. हे म्हणणे खरे आहे की वादी व प्रतिवादी यांचे आपसात पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की वादीने त्यामुळे प्रतिवादीविरोधात तक्रारी दाखल केल्या. हे म्हणणे खरे नाही की यादवराव व मनोहर बावणे यांच्या घराच्या मध्ये येण्या जाण्यासाठी छोटी ६ फूटाची गल्ली होती हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की त्या गल्लीतून आजूबाजूचे लोक व त्यांचे भाउ ये जा करत होते हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की प्रतीवादी नवीन घराचे बांधकाम करत असल्यामुळे गल्ली बंद झाली हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की मनोहर बावणे यांनी त्यांच्या नवीन घराचे बांधकाम जुने घराच्या जागेमध्ये न करता रोड ला लागून केले हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की बांधकाम केल्यामुळे प्रतिवादीच्या घराच्या मागे राहणा–या लोकांना गल्लीतील रस्ता बंद झाला असे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी यांनी ६ फुटाची गल्ली रस्त्यावर बांधकाम करून बंद केली नाही.

७. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादीला प्रधान मंत्री आवास योजनेतून घर मंजूर झाले. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने शासनाच्या नियमानूसार व अटीनूसार बांधकाम केले. हे म्हणणे खरे नाही की मी वादीचा मित्र आहे व म्हणून मी त्यांच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देतो.

**उलटतपास संपला**.

**फेरतपासणी नाही**.

श्रवणोत्तर स्वीकृत

समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT

Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.06.21 11:18:40 +0530

कामठी ( एम.आर. कामत )

दिनांक २०/०६/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी